MHBI060000132025

**नियमीत दिवाणी दावा क्र. ०२/२०२५ मधील निशाणी क्र. ५ खालील आदेश**

तुळसाबाई व इतर :- **वादी.**

**विरुध्द**

सुनंदा व इतर :- **प्रतिवादी.**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी तात्पुरता मनाई हुकुम मिळण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ३९ नियम १ व २, कलम १५१ प्रमाणे दाखल केला आहे.

२. वादी यांचे थोडक्यात कथन असे आहे की, वादी क्र. १ चा वादी क्र. २ हा मुलगा आहे. वादी क्र. १ यांचे पती बालासाहेब लिंबाजी सोनपिर हे सन १९९२ साली मयत झाले आहेत. वादी क्र. ३ हा वादी क्र. १ चा दिर आहे. वादी क्र. ३ व मयत बालाजी लिंबाजी सोनपीर यांच्या प्रतिवादी या सख्या बहिणी आहेत. प्रतिवादींचे वडील लिंबाजी वैजनाथ सोनपीर हे दिनांक १४.०७.२०२४ व आई दिनांक १७.०८.२०२४ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र. ३ चा पती गणपत फड हा वादी क्र. १ चा सख्खा भाउ आहे व वादी क्र. २ चा मामा आहे.

३. मौजे घाटनांदुर येथील गट क्र. ७१६ मधील ४ हे. ५४ आर पैकी ५६.५० आर, गट क्र. ७१७ मधील १ हे. ७९ आर मधील ४५ आर व गट क्र. १८ मधील ६ हे. ७९ आर मधील २९.५० आर जमीन ही वादग्रस्त मिळकत आहे. वादी क्र. ३ यांनी वादी क्र. १ व २ व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विरूध्द अंबाजोगाई येथील दिवाणी न्यायालय व. स्तर येथे विशेष दिवाणी दावा क्र. ५५/२००३ हा दाखल केला होता व सदर दाव्यामध्ये दिनांक १५.०४.२०११ रोजी मंजुर होवुन हुकुमनामा पारीत झाला होता.

त्यानंतर सदर दाव्यातील हुकुमनाम्याच्या नाराजीने मा. उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद येथे अपिल क्र. १२५७/२०११ दाखल केले होते व सदरचे अपिल मा. जिल्हा न्यायालय अंबाजोगाई येथे वर्ग होवुन सदर अपिलास नियमीत दिवाणी दावा क्र. ११५/२०१२ असा क्रमांक देण्यात आला होता. पुढे चालुन सदर अपिलात निशाणी क्र. २५ अन्वये समजपत्र झाले व दिनांक २४.१२.२०२१ रोजी हुकुमनामा पारीत झाला. त्यामुळे दाव्यातील हुकुमनाम्यापासुन प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा वादग्रस्त मिळकतीशी कसलाही संबंध नाही. लिंबाजी वैजनाथ सोनपिर व इंद्राबाई लिंबाजी सोनपीर यांची वादी यांनी चांगली सेवा केलेली आहे. दिनांक२२.०३.२०२४ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ४ या वादी यांच्याकडे आल्या व वादी यांना म्हणाल्या की, वडीलांना आमच्याकडे काही दिवस घेवुन जातोत असे म्हणुन घेवून गेल्या. दिनांक २४.०३.२०२४ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ४ या लिंबाजी सोनपीर यांना घेवून परत वादी यांच्या घरी आल्या व वडील रहायचे नको म्हणाले म्हणुन त्यांना आणुन सोडले आहे असे म्हणाल्या. त्यानंतर लिंबाजी सोनपीर हे दिनांक १४.०७.२०२४ रोजी मयत झाले व त्यानंतर इंद्राबाई लिंबाजी सोनपीर या मयत झाल्या.

४. वादी यांचे पुढे असे कथन आहे की, दिनांक २५.११.२०२४ रोजी तलाठी सज्ञा घाटनांदुर यांच्याद्वारे वादी यांना माहीती मिळाली की, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दिनांक १५.११.२०२४ रोजी मृत्युपत्र क्र. १७८९/२०२४ दिनांक २३.०३.२०२४ आधारे वादग्रस्त मिळकतीस फेरफार घेणेकामी अर्ज दिला आहे व त्याआधारे फेरफार क्र. ५९२६ दिनांक १५.११.२०२४ रोजी नोंदवला आहे. त्यानंतर वादी यांना माहीत झाले की, प्रतिवादी यांनी संगनमत करून दिनांक २३.०३.२०२४ रोजी लिंबाजी सोनपीर यांची दिशाभुल करून त्यांची फसवणुक करून त्यांच्यावर दबाव टाकुन त्यांच्याबडुन बळजबरीने मृत्युपत्र करून घेतले आहे. वादग्रस्त मिळकती ही आजपावेतो वादी यांच्या कब्जात आहे. विशेष दिवाणी दावा क्र. ५५/२००३ मध्ये अथवा नियमीत दिवाणी दावा क्र.

११५/२०१२ मधील निशाणी क्र. २५ वरील समजपत्रामध्ये वादग्रस्त मिळकत क्र. २ ची चतु:सिमा नमुद नाही व सदर गट क्र. ७१७ मध्ये वादग्रस्त मिळकत क्र. २ निश्चीत कोणत्या ठिकाणी आहे हे नमुद नाही,तसेच गट क्र. ७१७ मधुन अंबाजोगाई–घाटनांदुर–अहमपुर हा राज्य रस्ता झालेला आहे व सदर रस्ता १०० फुट आहे, सदर रस्त्याची पुर्व–पश्चिम लांबी १२०० फुट आहे. अशा रितीने सदर गट क्र. ७१७ मधील एकुण १ हे. ७९ आर क्षेत्रापैकी सदर रस्त्यासाठी १हे. १० आर एवढे क्षेत्र गेलेले आहे व ते ७/१२ उता–यावरून अदयाप कमी झालेले नाही. सदर रस्त्यामध्ये वादग्रस्त मिळकत क्र. २ मधील ३० आर क्षेत्र पूर्वीच गेलेले आहे व त्या ठिकाणी १५ आर क्षेत्र उपलब्ध आहे. सदर १५ आर क्षेत्राचेही निश्चित ठिकाण आजपावेतो कुठल्याही शासकिय अभिलेखान्वये निश्चित झालेले नाही. तसेच सदर गट क्र. ७१७ मध्ये अन्य ४ पेक्षा अधिक हिस्सेदार आहेत. त्यामुळे विशेष दिवाणी दावा क्र. ५५/२००३ मध्ये अथवा नियमीत दिवाणी दावा क्र. ११५/२०१२ मधील निशाणी क्र. २५ वरील समजपत्रामध्ये वादग्रस्त मिळकत २ च्या चतु:सिमा नमुद करण्यात आल्या नाहीत, परंतु लिंबाजी सोनपीर यांचे नावे सदर गट क्र. ७१७ च्या ७/१२ अभिलेखामध्ये ४५ आर क्षेत्राची नोंद पुर्वीपासुन चालत आलेली आहे. विशेष दिवाणी दावा क्र. ५५/२००३ मध्ये अथवा नियमीत दिवाणी दावा क्र. ११५/२०१२ मधील निशाणी क्र. २५ वरील समजपत्रामध्ये वादग्रस्त मिळकत ३ च्या चतु:सिमा नमुद नाहीत. गट क्र. ७१८ चे क्षेत्रफळ ६ हे. ७९ आर एवढे असुन त्यामध्ये वादग्रस्त मिळकत क्र. ३ (२९.५० आर ) निश्चित कोणत्या ठिकाणी आहे हे नमुद नाही. परिच्छेद क्र. १२ ते १४ मध्ये दिलेली वस्तुस्थीती असतानाही वादग्रस्त मिळकत क्र. २ मध्ये शासनाचे हितसंबंध असतानाही व सदरील लिंबाजी सोनपीर यांचे नावे वादग्रस्त जमीन मिळकीच्या ७/१२ अभिलेखामध्ये असलेल्या नोंदीचा गैरफायदा घेण्याच्या उददेशाने व वादग्रस्त मिळकत हडप करण्याच्या उददेशाने प्रतिवादी यांनी त्यांच्या सासरकडील लोकांशी संगनमत करून दिनांक २३.०३.२०२४ रोजी लिंबाजी सोनपीर यांची दिशाभुल करून त्यांच्यावर दबाव टाकुन

त्यांच्याकडुन मृत्युप्रमाणपत्र करून घेतले आहे. दिनांक १५.१२.२०२४ रोजी वादींनी प्रतिवादींना दाव्यातील तथाकथीत मृत्युपत्र रदद करण्याबाबत अथवा अवैध ठरवण्याबाबत योग्य तो दस्त करण्याबाबत विनंती केली असता प्रतिवादींनी त्यास नकार दिला व तथाकथीत मृत्युपत्राआधारे वादग्रस्त मिळकतीबाबत त्रयस्त व्यक्तीच्या नावे नोंदणीकृत किंवा अनोंदणीकृत दस्त करून देण्याची किंवा कर्ज बोजा निर्माण करण्याची धमकी वादी यांना दिली, त्यामुळे वादी यांना सदर दावा दाखल करण्याचे कारण घडले आहे. सबब वादीचा अर्ज मंजूर करण्यात यावा व दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यत प्रतिवादी यांनी वाद मिळकत इतर कोणासही विक्री, गहाण, तारण, हस्तांतरण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्यात यावा.

५. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.१६ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल आहे. प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ४ या मयत लिंबाजी व इंद्राबाई यांच्या मुली आहेत. लिंबाजी व इंद्राबाई यांना प्रतिवादी यांच्या व्यतीरीक्त वैजनाथ व बालासाहेब अशी दोन मुले आहेत व त्यापैकी बालासाहेब हे पूर्वीच मयत झाले आहेत. सुमारे २५ वर्षापुर्वी वादी व मयत लिंबाजी व इंद्रबाई यांच्यामध्ये मिळकतीच्या व इतर कौटुंबीक कारणामुळे वाद झाल्याने ते एकमेकांपासुन विभक्त राहु लागले. प्रतिवादींनी वादी व मयत लिंबाजी व इंद्राबाई यांच्यामधील वाद मिटवण्याचा प्रयत्न केला परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. वाद विकोपाला गेल्याने सन २००३ मध्ये वादी क्र. ३ याने मयत लिंबाजी, इंद्राबाई व प्रतिवादी व इतरांविरूध्द विशेष दिवाणी दावा क्र. ५५/२००३ दाखल केला होता व तो दावा मंजुर झाल्याने त्या दाव्यातील निकालाच्या नाराजीने त्याचे अपिल क्र. ११५/२०१२ दाखल झाले. मयत लिंबाजी व इंद्राबाई हे वयोवृध्द असतानाही वादी हे त्यांना कसल्याही प्रकारची मदत करत नसल्याने प्रतिवादी क्र. १ ते ४ या मयत लिंबाजी व इंद्राबाई यांचा सांभाळ करत होत्या व त्यासाठी प्रतिवादी क्र. १ ही मौजे हनुमंतवाडी येथे

लिंबाजी व इंद्राबाई यांच्यासोबत राहु लागली व प्रतिवादी क्र. २ ते ४ या नियमीतपणे ये जा करून त्यांची सेवा करू लागल्या, परंतु वादी यांनी त्यांची कधीही विचारपूस केली नाही, उलट त्यांच्याशी भांडण करून त्यांना त्रास देत असल्यामुळे मयत लिंबाजी यांच्या मनात वादींविषयी कसल्याही प्रकारची प्रेमभावना राहीली नव्हती. प्रतिवादी यांनी लिंबाजी व इंद्रबाई यांच्या काळजीपोटी त्यांच्या मुलांसोबत चांगले संबंध रहावेत म्हणुन खुप प्रयत्न केला व त्याप्रमाणे वादी व लिंबाजी यांच्यामध्ये मिळकतीची कायमस्वरूपी वाटणी करून नियमीत दिवाणी अपिल क्र. ११५/२०१२ मध्ये समजपत्र दाखल केले व त्या समजपत्राआधारे मिळकतीची वाटणी करून दिलेली आहे. नियमीत दिवाणी दावा क्र. ११५/२०१२ मध्ये वाटणी झाल्यानंतर वादी व मयत लिंबाजी आपापले हिस्सेवर काबीज राहुन वादग्रस्त मिळकतीचा उपभोग घेत होते, परंतु वादींनी लिंबाजी व इंद्राबाई यांची कसलही काळजी घेतली नाही, परंतु प्रतिवादी या आईवडीलांच्या प्रमापोटी त्यांची काळजी घेत होत्या. लिंबाजी व इंद्राबाई यांच्या मृत्युनंतरही प्रतिवादी क्र. १ ही मौजे हनुमंतवाडी येथे लिंबाजी व इंद्राबाई यांच्या घरातच रहात होती. परंतु त्या काळात वादी हे प्रतिवादी क्र. १ हिस घरामध्ये न राहण्याबाबत तगादा लावत होते व त्यामुळे ऑक्टोबर २०२४ मध्ये प्रतिवादी क्र. १ ही तिचे आईवडीलांसोबत रहात असलेल्या रूममधील सामान घेवून खापरटोन येथे आली व त्यावेळी मयत लिंबाजी हे जमीनीचे कागदपत्र ठेवत असलेल्या पेटीमध्ये पतिवादी क्र. १ हीला इतर कागदपत्रांसह मृत्युप्रमाणपत्र आढळुन आले. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना बोलावुन घेवून कागदपत्रांची चौकशी केली असता प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या प्रेमापोटी मयत लिंबाजी यांनी त्यांच्या हयातीमध्येच मृत्युपत्र करून ठेवल्याचे समजले.

६. प्रतिवादी यांचे पुढे असे कथन आहे की, नियमीत दिवाणी दावा क्र. ११५/२०१२ मधील समजपत्राप्रमाणे मयत लिंबाजी हे गट क्र. ७१६ मधील ५६.५ आर,

गट क्र. ७१८ मधील २९ आर व गट क्र. ७१७ मधील ४५ आर क्षेत्राचे स्वतंत्र मालक होते व त्यांनी सदरच्या मिळकतीबाबत नोंदणीकृत मृत्युपत्र करून ठेवलेले असल्याने त्याबाबत आक्षेप घेण्याचा वादींना अधिकार नाही. मयत लिंबाजी यांनी त्यांची अंतिम इच्छा म्हणून नोंदणीकृत दस्त क्र. १७८९/२०२४ हा करून ठेवला असल्याने व लिंबाजी हे मयत झाले असल्याने प्रतिवादी या वादग्रस्त मिळकतीच्या कायदेशीर मालक आहेत. नियमीत दिवाणी अपिल क्र. ११५/२०१२ मधील समजपत्राआधारे वादींनी मयत लिंबाजी यांचा मृत्युपत्र दस्त क्र. १७८९/२०२४ मधील जमीनीची मालकी व ताबा मान्य केलेला असल्याने दाव्यातील वादींचे कथनास इस्टॉपलचे तत्व लागु होते. नियमीत दिवाणी अपिल क्र. ११५/२०१२ मधील समजपत्रानंतर मयत लिंबाजी हे वादग्रस्त मृत्युपत्रातील जमीनीचे स्वतंत्र मालक झाले असल्याने ती मिळकत त्यांच्या हयातीत हस्तांतरी करण्याचा अथवा तिची विल्हेवाट लावण्याचा कायदेशीर अधिकार लिंबाजी यांना होता, त्यामुळे वादी स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेले नाहीत, त्यामुळे वादींचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज खर्चासह खारीज करण्यात यावा अशी प्रतिवादी यांनी विनंती केली आहे.

७. अर्ज, त्यावरील म्हणणे व वादी यांनी दाखल केलेले कागदपत्र याचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद सविस्तर ऐकला.

८. माझे विचारार्थ निघालेले मुददे व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी यांच्या हक्कात सकृतदर्शनी प्रकरण आहे काय? | होय. |
| २. | न्यायाचा तराजू वादी यांच्या हक्कात आहे काय ? | होय. |
| ३. | अर्ज नामंजूर झाला तर वादी यांचे न भरुन येणारे | होय. |

नुकसान होईल काय?

४. आदेश काय ? अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमिमांसा

९. वादींनी अर्जाच्या पुष्टर्थ निशाणी क्र. ४ वरील यादीसोबत वाद मिळकत गट क्र. ७१६, ७१७ व ७१८ चे ७/१२ उतारे व मृत्युपत्र क्र. १७८९/२०२४ च्या प्रमाणीत प्रती दाखल केल्या आहेत. तसेच निशाणी क्र. ३२ वरील यादीसोबत मयत लिंबाजी यांचे फोटो, मंडळ अधिकारी घाटनांदुर यांनी वादी यांना फेरफार क्र. ५९२६ बाबत दिलेला अर्ज व वादग्रस्त मिळकतीचा नकाशा याच्या छायांकीत प्रती दाखल केल्या आहेत. प्रतिवादी यांनी कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाहीत.

१०. वादी यांच्या विद्वान विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, प्रतिवादी यांनी लिंबाजी यांचे बोगस मृत्युपत्र तयार करून वाद मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. प्रतिवादी यांनी वाद मिळकत विक्री केल्यास वादीला कायदेशीर हक्कापासून वंचित रहावे लागणार आहे व वादीचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सकृतदर्शनी केस व न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे. सबब वादीचा अर्ज मंजूर करण्यात यावा व दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यत प्रतिवादी यांनी वाद मिळकत इतर कोणासही विक्री, गहाण, तारण, हस्तांतरण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्यात यावा.

वादीच्या विधिज्ञांनी त्यांच्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ मा. सर्वोच्च न्यायलय व मा. उच्च न्यायालय यांच्या न्यायनिर्णयांचा अवलंब केला आहे.

१. ***जितेंद्र सिंह वि. मध्य प्रदेश सरकार, २०२१ एस.सी.सी. ऑनलाईन एस.सी. ८०२***

२. ***हरीश इश्वरभाई पटेल वि. जतीन इश्वरभाई पटेल, डी.एल.डी. (सिव्हील) २०२२–१७२६.***

*३. तेजस व इतर वि. उपमा भानुकुमार दर्यापुरकर, अपिल फ्रॉम ऑर्डर नं. ५१/२०२३ दिनांक १६.०७.२०२५.*

*४. सलोनी सिंह वि. यशवंत सिंह, ए.आय.आर. ऑनलाईन २०२३ ऑल ९७८*

वरील न्यायनिर्णयांच्या आधारे वादीच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, संशयास्पद परिस्थीतीत मृत्युपत्राचे काटेकोरपणे तपासणी होणे आवश्यक असते, त्यामुळे सदर प्रकरणात तात्पुरता मनाई हुकुम देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

११. प्रतिवादी यांच्या विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला आहे की, सदर मृत्युपत्र हे बेकायदेशीर ठरवण्यासाठी वादीकडुन कोणतेही ठोस कारण मांडण्यात आले नाही. तसेच मयत लिंबाजी हे सदर वादग्रस्त मिळकतीचे मालक असुन त्यांच्या संमतीनुसार समजपत्र व मृत्युपत्र झाले आहे. वादीला सदर मृत्युपत्राला आव्हाण देण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. मृत्युपत्रासोबत स्वास्थ प्रमाणपत्र जोडलेले असुन त्याद्वारे मृत्युपत्रकर्त्याची शारीरीक व मानसिक क्षमता प्रथमदर्शनी सिध्द होते. सदर मृत्युपत्र नोंदणीकत असल्याने त्याच्या वैधतेबाबत कायदयानुसार प्रतिवादीच्या बाजुने अनुमान उभे राहते. तसेच मालमत्ता ही मयत लिंबाजी यांच्या नावावर असल्यामुळे त्यांची मालमत्ता विक्री अथवा हस्तांतरणाबाबत कोणताही प्रतिबंध नाही. वादीस मालमत्ता हस्तातरण कायदा १८८२ च्या कलम ५२ अनवये संरक्षण उपलब्ध असुन त्यामुळे वादीचा हक्क सुरक्षीत आहे. वादी यांनी मयत लिंबाजी यांचा सांभाळ न केल्याने लिंबाजी प्रतिवादी क्र. १ हिने मौजे हनुमंत वाडी येथे राहुन मयत लिंबाजी व इंद्राबाई यांचा सांभाळ केला आहे. नियमीत दिवाणी अपिल क्र. ११५/२०१२ मधील समजपत्राआधारे वादींनी मयत लिंबाजी यांचा मृत्युपत्र दस्त क्र. १७८९/२०२४ मधील जमीनीची मालकी व ताबा मान्य केलेला असल्याने दाव्यातील वादींचे कथनास इस्टॉपलचे तत्व लागु होते. नियमीत दिवाणी अपिल

क्र. ११५/२०१२ मधील समजपत्रानंतर मयत लिंबाजी हे वादग्रस्त मृत्युपत्रातील जमीनीचे स्वतंत्र मालक झाले असल्याने ती मिळकत त्यांच्या हयातीत हस्तांतरी करण्याचा अथवा तिची विल्हेवाट लावण्याचा कायदेशीर अधिकार लिंबाजी यांना होता, त्यामुळे वादी स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेले नाहीत, त्यामुळे वादींचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज खर्चासह खारीज करण्यात यावा अशी प्रतिवादी यांनी विनंती केली आहे.

**<u>मुददा क्र. १ करीता</u> :–**

१२. अर्ज, त्यावरील म्हणणे, अभिलेखावरील कागदपत्र यांचे अवलोकन केल्यानंतर व दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर असे दिसुन येते की, वादी व प्रतिवादी यांच्यामधील नातेसंबंध उभयपक्षांना मान्य आहेत. तसेच जमीन गट क्र. क्र. ७१६, ७१७ व ७१८ चे ७/१२ मधील मिळकती मयत लिंबाजी यांना वाटुन आल्याचे प्रतिवादींनी मान्य केले आहे. वादींकडुन दाखल करण्यात आलेले न्यायनिर्णयांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वरील मा. सर्वोच्च व उच्च् न्यायालयाचे न्यायनिर्णय हे त्या त्या प्रकरणातील वस्तुस्थीती व पुराव्याच्या पार्श्वभुमीवर दिलेले असुन सदर प्रकरणातील वादग्रस्त मिळकत, मृत्युपत्र व पक्षकारांचे हक्क याबाबतची वस्तुस्थीती वेगळी आहे. त्यामुळे सदर न्यायनिर्णय या प्रकरणात लागु होत नाहीत.

१३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता, वाद मिळकतीमध्ये वादी यांचे कायदेशीर हक्क असल्याचे वादीने शपथेवर कथन केले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी यांनी मयत लिंबाजी यांची दिशाभुल, फसवणुक करून दबाव आणुन सदर मृत्युपत्र केले आहे. मृत्युपत्रासोबत दाखल करण्यात आलेले वैदयकीय प्रमाणपत्र हे शासकिय रूग्णालयाचे नसुन ते संशयास्पद आहे. सबब वादीचा वाद मिळकतीमध्ये कायदेशीर हक्क असल्याचे वादीने सकृतदर्शन सिध्द केले आहे. याउलट प्रतिवादींनी असे कथन केले आहे

की, नियमीत दिवाणी दावा क्र. ११५/२०१२ मधील समजपत्राप्रमाणे मयत लिंबाजी हे गट क्र. ७१६ मधील ५६.५ आर, गट क्र. ७१८ मधील २९ आर व गट क्र. ७१७ मधील ४५ आर क्षेत्राचे स्वतंत्र मालक होते व त्यांनी सदरच्या मिळकतीबाबत नोंदणीकृत मृत्युपत्र करून ठेवलेले असल्याने त्याबाबत आक्षेप घेण्याचा वादींना अधिकार नाही. मयत लिंबाजी यांनी त्यांची अंतिम इच्छा म्हणून नोंदणीकृत दस्त क्र. १७८९/२०२४ हा करून ठेवला असल्याने व लिंबाजी हे मयत झाले असल्याने प्रतिवादी या वादग्रस्त मिळकतीच्या कायदेशीर मालक आहेत. नियमीत दिवाणी अपिल क्र. ११५/२०१२ मधील समजपत्रानंतर मयत लिंबाजी हे वादग्रस्त मृत्युपत्रातील जमीनीचे स्वतंत्र मालक झाले असल्याने ती मिळकत त्यांच्या हयातीत हस्तांतरी करण्याचा अथवा तिची विल्हेवाट लावण्याचा कायदेशीर अधिकार लिंबाजी यांना होता.

१४. प्रतिवादीकडुन मृत्युपत्र नोंदणीकृत असल्याचा व सोबत स्वास्थ प्रमाणपत्र जोडलेले असल्याचा युक्तीवाद करण्यात आला असला तरी नोंदणी किंवा स्वास्थ प्रमाणपत्र हे मृत्युपत्राचे अंतिम वैधता ठरवणारे निर्णायक घटक नाहीत. तर ते फक्त पुराव्याचा एक भाग आहेत. मृत्युपत्राबाबतचा वाद हा प्रामुख्याने पुराव्यावर आधारीत प्रश्न असुन त्याचा सखोल विचार अंतिम सुनावणीच्या टप्प्यावरच होवु शकतो. प्रतिवादींकडुन असा युम्तीवाद करण्यात आला की वादींना मालमत्ता हस्तांतरण कायदा चे कलम ५२ अन्वये lis pendence चे संरक्षण उपलब्ध असल्यामुळे तात्पुरता मनाई हुकुम देण्याची गरज नाही. तथापी कलम ५२ चे संरक्षण हे व्यवहारांना आधिन ठेवते, परंतु ते वादग्रस्त मिळमतीची स्थीती जशीच्या तशी ठेवण्याची हमी देत नाही. वाद प्रलंबित असताना जर मालमत्तेबाबत विक्री, हस्तांतरण अथवा तृतीय पक्ष हक्क निर्माण झाले तर भविष्यातील निर्णय आमलात आणताना गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वादीने सदर वादग्रस्त मिळकतीबाबत करण्यात आलेल्या मृत्युपत्राच्या वैधतेवर गंभीर आक्षेप घेतला आहे. वादीने

उपस्थीत केलेला आक्षेप हा तांत्रीक स्वरूपाचा नसुन मृत्युपत्र कर्त्याची शारीरीक व मानसिक क्षमता, मृत्युपत्र तयार करण्याची परिस्थीती व त्याचा परिणाम याबाबत सकृतदर्शनी संशय निर्माण करणारे आहेत. वादी यांनी प्रस्तुत दाव्यात चौकशी करता येण्याजोगा, गुणदोषावर निश्चित करता येण्याजोगा तसेच तपास करता येण्याजोगा मुददा दाखवून दिला आहे. यालाच सकृतदर्शनी प्रकरण म्हणता येईल. ज्या अर्थी वादीच्या हक्कात सकृतदर्शनी प्रकरण आहे, त्या अर्थी मी मुददा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुददा क्र. २ व ३ करीता :-**

१५. मुददे क्र. २ व ३ यांची कारणमिमांसा ब-याच अंशी सारखी असल्याने मी दोन्ही मुददे एकत्रीतपणे चर्चेसाठी घेत आहे.

१६. न्यायाचा समतोल कोणाच्या हक्कात आहे हे ठरवण्यासाठी वादी यांच्या लाभात मनाई हुकुम दिल्यास प्रतिवादी यांना होणारे नुकसान व वादी यांच्या लाभात मनाई हुकुम न दिल्यास वादी यांना होणारे नुकसान याचा समतोल पाहणे आवश्यक आहे. वाद मिळकतीमध्ये वादी यांचे कायदेशीर हक्क सकृतदर्शनी दिसुन येत असल्याबाबतचे निष्कर्ष मी मुददा क्र. १ मध्ये नोंदवले आहेत. असे असताना वादी यांनी मागणी केल्याप्रमाणे दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी यांना वादमिळकती हस्तांतरीत करण्यास अंतरिम मनाई केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट तशी मनाई न दिली गेल्यास व वादमिळकती हस्तांतरीत झाल्यास दाव्याची गुंतागुंत वाढणार आहे. तसेच वादींना नुकसान होणार आहे. त्यामुळे अंतरिम मनाई हुकुम दिल्यास प्रतिवादी यांना होणारे नुकसान हे मनाई हुकुम न दिल्यास वादींना होणा-या नुकसानापेक्षा कमी आहे. सबब न्यायाचा समतोल वादी यांच्या बाजूने आहे.

१७. वादी यांचा वाद मिळकतीत प्रथमदर्शनी कायदेशीर अधिकार दिसत असताना दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी यांनी वादमिळकती हस्तांतरीत केल्यास वादींना होणा–या मानसिक त्रासाची भरपाई पैशाच्या स्वरुपात करता येणार नाही. याउलट मनाई हुकुम दिल्यानंतरही वाद मिळकतीमधील प्रतिवादी यांच्या हिस्याच्या अधिकाराचा उपभोग संबंधीत प्रतिवादी घेवू शकणार आहे व त्यांना न भरुन येणारे नुकसान होणार नाही. सबब, अंतरिम मनाई हुकुम न दिला गेल्यास वादी यांचे न भरुन येणार अपरिमीत नुकसान होणार आहे. उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने मी मुददे क्र. २ व ३ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुददा क्र. ४ करीता</u> :–**

१८. तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यास वादीस सकृतदर्शनी प्रकरण, न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने व अर्ज मंजूर न केल्यास वादीस होणारे अपरिमीत नुकसान सिध्द करणे गरजेचे आहे. वादीस वरील तिन्ही मुददे एकत्रीतपणे प्रकरणात असल्याबाबत प्रथमदर्शनी पुरावा देणे गरजेचे आहे. वरील तीनही मुददे वादीने वाद मिळकतीबाबत प्रथमदर्शनी सिध्द केले आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे ज्यावेळी अजर्दारास त्याच्या हक्कास बाधा पोहोचण्याचा धोका संभवत असेल त्यावेळी तुर्तातुर्त मनाईचा आदेश अर्जदार मागू शकतो. सदर धोक्याच्या जाणीवेबाबत आदेश ३९ नियम १ प्रमाणे सदर अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र लक्षात घेता येते. प्रतिवादी हे वाद मिळकती हस्तांतरीत करण्याच्या तयारीत असल्याचे प्रतिज्ञापत्र वादी यांनी प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेले आहे. या बाबीचा व मुददे क्र. १ ते ३ चा सांगोपांग विचार करुन मुददा क्र. ४ च्या अनुषंगाने मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी क्र. ०५ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यत दाव्यातील परिच्छेद क्र.

३. मध्ये दर्शवलेल्या वादग्रस्त मिळकतीं इतर कोणासही विक्री अथवा अन्य मार्गाने हस्तांतरीत करून त्यावर कर्ज बोजा निर्माण करू नये असा तुर्तातुर्त मनाईचा हुकुम देण्यात येत आहे.

३. अर्जाच्या खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

सही/-

स्थळ-अंबाजोगाई (ए.एम.ढवळे )

दिनांक २९.०१.२०२६ ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
अंबाजोगाई

**प्रमाणपत्र**

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयातील शब्द–नि–शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

**लघुलेखक ग्रेड–३** :– **ए.एस.गंगणे**

न्यायालयाचे नाव :– ३रे सह दिवाणी न्यायालय क. स्तर, अंबाजोगाई

न्यायनिर्णयाची तारीख :– **२९.०१.२०२६**

न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख :– **२९.०१.२०२६**

न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख :– **२९.०१.२०२६**

सही/–
**(ए.एस.गंगणे)**
(लघुलेखक ग्रेड–३)
३रे सह दिवाणी न्यायालय क.
स्तर, अंबाजोगाई